- प्रेस नोट - दिनांक १५.०५.२०१९

लोकसेवक हरिदास नामदेव काकडे वय ४४ वर्षे, तलाठी सजा हिंगणगाव, ता.गेवराई जि.बीड वर्ग ३, यांनी तक्रारदार यांचे जमीनीचा फेरफार ऑनलाईन करून दिल्याबददल १००० रु बक्षीस म्हणुन लाच स्विकारतांना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड. |
| गुन्हा नोंद कमांक | पो.स्टे. गेवराई येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया चालु आहे. |
| कलम | कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | हरिदास नामदेव काकडे वय ४४ वर्षे, तलाठी सजा हिंगणगाव, ता.गेवराई जि.बीड वर्ग ३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू १,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू १,०००/- |
| थोडक्यात माहिती | दिनांक १३.०५.२०१९ रोजी तकारदार यांनी ला.प्र.वि.बीड कार्यालयात तकार दिली की, तक्रारदार यांचे जमीनीचा फेरफार ऑनलाईन करून दिल्याबद्दल, तलाठी हरिदास काकडे सजा हिंगणगाव हे १,००० रुपये बक्षीस म्हणुन लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तकार दिली.<br>सदर तकारीबाबत दि.१३.०५.२०१९ रोजी खात्री केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे केलेल्या कामासाठी १,०००/-रुपये बक्षीस म्हणुन लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरुन आज दि.१५.०५.२०१९ रोजी गेवराई येथील तलाठी सजा हिंगणगाव कार्यालय, परिसरात आलोसे विरुध्द लाचेचा सापळा लावला असता आलोसे हरिदास नामदेव काकडे वय ४४ वर्षे, तलाठी सजा हिंगणगाव, ता.गेवराई जि.बीड वर्ग ३ यांना १,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले असून त्यांचेविरुध्द पोस्टे गेवराई येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु आहे. |

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद, मा.श्री.एस.एस.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली श्री.गजानन वाघ, पोलीस निरीक्षक, लाप्रवि बीड व टीम ला. प्र.वि.बीड युनिट यांनी केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्यल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड
संकेतस्थळ :-acbwebmail@mahapolice.gov.in
ई-मेल :-dyspacbbeed@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :-acbmaharashtra.net
टोल फ्रि कमांक :- १०६४
दुरध्वनी कमांक :-०२४४२-२२२६४९
व्हॉटस अप क. :-९९३०९९७७००

स्वाक्षरित
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

Scanned by CamScanner